# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### साकोली (जि.भंडारा) तालुक्यातील निम्न चुलबंद, भीमलकसा सिंचन प्रकल्प अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

**(१) ९१ (१०-०४-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोली (जि.भंडारा) तालुक्यातील निम्न चुलबंद, भीमलकसा हे सिंचन प्रकल्प अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित प्रकल्प सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०४-०९-२०२०) :** (१) नाही.

(२) नाही, प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. निम्न चुलबंद उसिंयो - निम्न चुलबंद उसिंयो चे बॅरेज, पंपगृह व इतर शिर्ष कामे व उजव्या कालव्याची कामे पुर्ण झाली असून डावा कालव्याची ८०% कामे पुर्ण झाली आहेत. डाव्या कालव्याची उर्वरीत २०% कामे बंद नलिकेव्दारे करण्याचे प्रस्तावित आहेत. सन २०१८-१९ चे खरीप हंगामात या प्रकल्पाव्दारे १६७० हे. प्रत्यक्ष सिंचन करण्यात आले आहे. ही योजना जून २०२१ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

भीमलकसा लघु प्रकल्प - भीमलकसा लघु प्रकल्प योजनेचे मातीधरण व सांडव्याची कामे पुर्ण झालेली असून पाणीसाठा करण्यात आला आहे. सन २०१८-१९ चे खरीप हंगामात या प्रकल्पाव्दारे २०० हे. प्रत्यक्ष सिंचन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सेवानिवृत्त हजेरी सहायक यांना निवृत्ती वेतन देण्याबाबत**

**(२) १४३ (१४-०४-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे १२०० सेवानिवृत्ती हजेरी सहायक मागील ५ वर्षापासून निवृत्ती वेतनापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हजेरी सहायकांना निवृत्ती वेतन मिळण्याबाबत सचिव, रोजगार हमी योजना यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सेवानिवृत्ती हजेरी सहायक यांना तात्काळ निवृत्ती वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०४-०९-२०२०) :** (१), (२) व (३) दि.२६.०५.१९९३ ते दि.३१.०५.१९९३ या कालावधीत हजेरी सहाय्यक पदावर कार्यरत असलेल्या हजेरी सहाय्यकांना त्याच्या शैक्षणिक अर्हतेनुसार गट क व गट ड सेवेत सामावून घेण्याचा धोरणात्मक निर्णय दि.१.१२.१९९५ व दि.२१.४.१९९९ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. समावेशनासाठी शिल्लक राहिलेल्या हजेरी सहाय्यकांना दि.२५.०६.२००४ च्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदे निर्माण करुन त्यांना त्या दिवसांपासून शासकीय सेवेचे लाभ अनुज्ञेय करण्यात आले आहे. थोडक्यात, त्यांना शासन सेवेविषयक सर्व लाभ मिळतील व राज्य शासनाचे कर्मचारी म्हणून राहतील. शासन सेवेत समावेशन झाल्यानंतर १० वर्षांची अर्हताकारी सेवा सेवानिवृत्तीकरिता ग्राह्य धरण्यात येते.

सबब, हजेरी सहाय्यकांचे समावेशन झाल्यानंतर त्यांची अर्हताकारी शासकीय सेवा १० वर्षांची झाल्यानंतर त्यांना सेवानिवृत्ती वेतन लागू होते. हजेरी सहाय्यकांचे समावेशन होण्यापूर्वीची हजेरी सहाय्यक पदावरील सेवा शासकीय सेवा नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बालभारतीच्या अकरावीच्या जीवशास्त्र विषयाच्या इंग्रजी पुस्तकात चुका आढळून आल्याबाबत**

**(३) ३५३ (०७-०४-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने (बालभारती) अकरावीच्या जीवशास्त्र विषयाच्या इंग्रजी पुस्तकात केलेल्या चुकांनंतर शुद्धिपत्रकातही पानोपानी चुका केल्याचे माहे डिसेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास गरवारे महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख म्हणून निवृत्त झालेल्या डॉ. हेमलता साने यांनी पुस्तकातील चुकांचा तपशीलवार अहवालच बालभारतीला सादर करून तसेच चुका तपशीलवार दाखवूनही त्याची दखल घेतली नसल्याने पुस्तकातील चुकांमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०४-०९-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

मात्र याबाबतचे वृत्त वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जुवाठी धरण (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील डावा कालव्यासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना अद्याप मिळाला नसल्याबाबत

**(४) ३९९ (१६-०४-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या लघू पाटबंधारे योजनेअंतर्गत राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शेतकऱ्यांची जुवाठी धरण डावा कालव्यासाठी शेती संपादित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादन केलेल्या शेतकऱ्याना भूसंपादनापोटी किती लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत व किती भूसंपादित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याना मोबदला वाटप करण्यात आला आहे व किती शेतकरी या मोबदल्यापासून वंचित आहेत, तसेच या धरण डाव्या कालव्याची सिंचन क्षमता किती हेक्टर आहे,

(३) असल्यास, भूसंपादन मोबदल्यापासून वंचित राहणाऱ्या शेतकऱ्याना अद्याप मोबदला न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वंचित राहणाऱ्या शेतकऱ्यांना मोबदला तातडीने देणेबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२८-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे

(२) ल.पा.यो. जुवाठी ता. राजापूर या प्रकल्पाकरिता संपादित केलेल्या एस आर क्र.४७३/४२ या भूसंपादन प्रकरणी उपविभागीय अधिकारी (महसूल), राजापूर यांनी दिनांक २८/०१/२०१५ अन्वये रु.१.०३ कोटी रक्कमेचा निवाडा घोषित केला आहे. त्यानुसार संबंधित ११५ प्रकल्पग्रस्त खातेदारांना रु. ४४,११,१६७/- वाटप करण्यात आले असून २३ खातेदारांची रु. ६,७४,७०५/- रक्कमेचा धनादेश कोषागार अधिकारी, राजापूर यांचेकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला होता.

परंतु वित्त विभागाने दिनांक ४/०५/२०२० रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार कोषागार अधिकारी, राजापूर यांनी सदर धनादेश मंजुर न करता परत पाठविलेला आहे. त्यानुसार उप विभागीय अधिकारी, राजापूर यांनी पुन:श्च जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे दिनांक २१/०५/२०२० रोजी प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

या योजनेच्या डाव्या कालव्याचे सिंचन क्षेत्र ७१ हेक्टर इतके आहे.

(३) व (४) उर्वरित २०३ खातेदार यांनी बँक खाते क्रमांक व आवश्यक कागदपत्र अद्याप सादर न केल्याने मोबदला देय करणेची कार्यवाही प्रलंबित असून उपविभागीय अधिकारी, राजापूर यांचेकडून संबंधित प्रकल्पग्रस्तांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे-सातारा महामार्गावरील चेलाडी-नसरापूर उड्डाणपुलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(५) १११५ (१६-०३-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सातारा महामार्गावरील चेलाडी-नसरापूर उड्डाणपुलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने या मार्गावरील विशेषतः वेल्हा, भोर तालुक्याचे मध्यवर्ती गाव आणि मुख्य बाजारपेठ, शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालये, मंगल कार्यालये इ. असल्याने या परिसरात वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ अखेरपर्यंत सदर उड्डाणपुलाच्या कामाची सध्यस्थिती काय आहे व काम पूर्ण होण्यास सुमारे किती कालावधी लागेल,

(३) तसेच सदर उड्डाणपुलाचे काम संथगतीने सुरू असण्याची कारणे काय आहेत व त्यामुळे निर्माण होणारी वाहतुक कोंडी रोखण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०२०) :** (१) पुणे सातारा महामार्गावरील चेलाडी नसरापूर उड्डाणपुलाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारीत येते.

सुरुवातीच्या काळात चेलाडी नसरापूर उड्डाणपुलाचे कामाची प्रगती जमीनी संदर्भातील मुद्दयांवरुन लोकांनी थांबविली होती. त्यानंतर लॉकडाऊन पूर्वी जोरदार काम चालू होते. त्या अनुषंगाने नसरापूर उड्डाणपूलाचा उजव्या बाजूचे काम पूर्ण झाले असून वाहतूकीसाठी दि.२०.०१.२०२० रोजी खुले करण्यात आले आहे व डाव्या बाजूचे अंतिम काम बाकी असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(२) सध्याचा लॉकडाऊन व पावसाळ्याचा विचार करता डाव्या बाजूच्या उड्डाणपुलाचे शिल्लक काम दि.३१.१०.२०२० पर्यंत पूर्ण केले जाईल, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.
(३) व (४) सुरुवातील नमुद केल्यानुसार भूसंपादन आणि संबंधित मुद्दयांमुळे कामात अडथळा निर्माण झाला होता परंतु प्रकरणाचे निराकरण झाल्यानंतर काम जोमाने सुरु झाल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे. वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी प्राधिकरणाकडून खालील उपाययोजना केल्या जातात.
दि.२०.०१.२०२० रोजी नसरापूर उड्डाणपूलाची उजवी बाजू वाहतूकीसाठी खुली करण्यात आली आणि डाव्या बाजूला डायव्हर्शन रस्ता देण्यात आला आणि वाहतूकीच्या हालचाली नियमित देखरेखीखाली आणल्या गेल्या.

---

**मौजे देऊळगाव धनगर (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील पाझर तलाव दुरुस्तीकामात झालेला गैरव्यवहार**

**(६) १३९९ (१३-०४-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे देऊळगाव धनगर (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील दुरुस्त करण्यात आलेल्या पाझर तलावाच्या कामांची चौकशी करण्याकरिता जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लेखी निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. शंकरराव गडाख (२८-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मौजे देऊळगाव धनगर ता.चिखली जि.बुलढाणा येथिल पाझर तलाव दुरुस्तीबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आलेली आहे. सदर कामाची पाहणी केली असता तक्रारकर्ते यांच्या शेताच्या उजव्या बाजुस उंच माथा आहे. त्यामुळे उंच भागातून पाणी वाहत येऊन शेतामध्ये साचते व सदरची जमीन ही साळीची असल्याने जमीन चिबडते. तसेच सरपंच व इतर ग्रामस्थ यांचे उपस्थितीत करण्यात आलेल्या कामाच्या स्थळपंचनाम्यानुसार सदर काम योग्य प्रकारे झालेले असुन अंदाजे २० फुट खोलीपर्यंत COT खोदलेली आहे व भराव काळ्या मातीचा केलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांसाठी कोल्हापूरात उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याबाबत**

**(७) १५२७ (२०-०३-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांसाठी कोल्हापूरात मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे अशी मागणी गत ३२ वर्षापासून वकील व पक्षकारांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास कृती समितीने बैठक घेऊन तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाची भुमिका काय आहे, त्याचे स्वरुप काय आहे व तद्नुसार कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०४-०९-२०२०) :** (१) होय.

(२) जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांचेकडून प्राप्त अहवालान्वये कळविले आहे की, कृती समितीची दि.३०/०१/२०२० रोजी यासंदर्भात बैठक होऊन दि.०४/०२/२०२० रोजी न्यायालयीन कामकाज बंद ठेवण्याचा व लोकअदालतीवर कायमचा बहिष्कार टाकणेबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) राज्यात उच्च न्यायालयाचे कायमस्वरुपी खंडपीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी त्यास राज्य पुर्नरचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५१ (२) नुसार उच्च न्यायालयाचे मा. मुख्य न्यायमूर्ती यांची सहमती आवश्यक आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या दि.१२/०५/२०१५ रोजीच्या बैठकीत कोल्हापूर येथे मा.उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात यावी, असी शिफारस मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे शासनाने दि. १७/०७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये शिफारस केली आहे. सदर शिफारशीचा सकारात्मक विचार करण्याची फेरविनंतीही दि. २८/०२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मा.मुख्य न्यायमुर्ती यांना करण्यात आली आहे. सदर प्रकरणी त्वरित निर्णय होण्याकरिता शासन पत्र, दि.१९/०१/२०१९ अन्वये याबाबत बैठक आयोजित करण्याबाबत मा.मुख्य न्यायमुर्ती, मुंबई उच्च न्यायालय यांना विनंती करण्यात आली असून शासन पत्र, विधि व न्याय विभाग, दि.१९/०३/२०२० अन्वये सदर विनंतीकडे उच्च न्यायालय प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील देवबाग, तारकर्ली किनारपट्टीवरील प्रवासी वाहतूक नौकांच्या दुरावस्थेबाबत**

**(८) १७६७ (१३-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील देवबाग, तारकर्ली किनारपट्टीवरील ४० प्रवासी वाहतूक नौका दुरावस्थेत असल्याचे बंदर विभागाने केलेल्या नौकांच्या सर्व्हेत माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नौकांमध्ये कोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नौका दुरावस्थेत स्थितीत ठेवणाऱ्या नौकां मालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (०४-०९-२०२०) :** (१), (२) व (३) लाईफ जॅकेट, रिंग बोया सुस्थितीत नसून बोटींची रंगरंगोटी व ऑईलींग आवश्यक असल्याचे निदर्शनास आले व बोटींची कागदपत्रे दाखविण्यात आली नव्हती. वरील सर्व त्रुटींची पुर्तता करण्यात आल्यानंतर बोटींचा पुन्हा सर्व्हे करून तात्पुरते सर्व्हे प्रमाणप्रत्र अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई भायखळा येथील सर जी.जी. समूह रुग्णालय व कामा रुग्णालयात कार्यरत असलेल्या अंशकालीन महिला कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नोकरीत सामाऊन घेणेबाबत**

**(९) २८०१ (२५-०३-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील सर जी.जी. समूह रुग्णालय व कामा रुग्णालयात गेले २० वर्षापासून रु.४१८/- इतक्या अल्पवेतनावर तात्पुरत्या अंशकालीन पदावर कार्यरत असलेल्या दर्शना पवार यांचेसह ६ अंशकालीन महिला कर्मचाऱ्यांना मुंबई जिल्हाधिकारी यांनी अंशकालीन लिपीक कर्मचारी म्हणून नोंदविण्यास नकार दिल्यामुळे सदरहू महिला कर्मचाऱ्यांना अद्याप शासनाने सेवेत कायम करण्यास मान्यता दिली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेले २० वर्षापासून लिपीक पदावर काम करुन शासनास सेवा प्रदान केली असल्याने व सद्यस्थितीत त्यांचे वय नियमबाह्य झाले असून त्यांना अन्यत्र कोठेही नोकरी मिळू शकणार नसल्याने सदरहू ६ महिला कर्मचारी यांना शासनाने प्राधान्याने सेवेत कायम करण्यात यावे या संदर्भात गेली पाच वर्षात अनेक लोकप्रतिनिधींनी शासनास लेखी पत्रे व निवेदने सादर करुनही अद्याप यावर शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे एप्रिल २०१६ मध्ये शासनाने ज.जी. रुग्णालयात ७७४ बदली कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले त्याच धर्तीवर जिल्हाधिकारी, मुंबई यांचेकडून अंशकालीन लिपिक कर्मचाऱ्यांची प्राधान्याने मान्यता घेऊन सदरहू महिला कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबतच्या मंत्रालयातील प्रलंबित प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, याबाबत शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०४-०९-२०२०) :** (१), (२), (३) व (४) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई येथे ६ अंशकालीन उमेदवार कार्यरत आहेत, या प्रकरणी कौशल्य विकास व उद्योजकता विभाग आणि सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले होते. "सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य" या योजनेतून शासनाच्या विविध कार्यालयात तात्पुरत्या स्वरुपात काही तासांकरिता काम करुन मानधन देण्यात येत होते. या योजनेची फलनिष्पती न झाल्याने रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या दि.११.२.२००४ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेत सुधारणा करुन "सुशिक्षित बेरोजगांराच्या सेवा सोसायट्यांना आर्थिक सहाय्य" अशी योजना सुरु करण्यात आली. या योजनेनुसार अंशकालीन उमेदवारांना सरळसेवेमध्ये गट-क पदाकरिता १०% समांतर आरक्षण लागू केले असून कमाल वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत शिथील केली आहे. अंशकालीन उमेदवारांना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याचे कोणतेही धोरण नाही. तसेच सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक दि.२५.८.२००५ मधील मार्गदर्शक सुचना विचारात घेता, या ०६ अंशकालीन उमेदवारांना शासन सेवेत नियमित करता येणार नाही.

सदर ०६ उमेदवार हे पदवीधर अंशकालीन उमेदवार नसल्याचे अभिप्राय कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने दिले आहेत.

---

**शेतीच्या नुकसानाचे सर्व्हेक्षण करून शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(१०) २८२६ (०५-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतीच्या झालेल्या नुकसानीचे सर्व्हेक्षण करून पिडीत शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत वि.स.स. बल्लारपूर यांनी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०३-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पिडीत शेतकऱ्यांना शेतीपिकांच्या नुकसानीबाबत आर्थिक मदत देण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मारोडा (ता.मुल, जि.चंद्रपूर) येथील वितरण पाईपलाईनसाठी अंदाजपत्रकानुसार निधी उपलब्ध करणेबाबत**

**(११) २९३१ (०७-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारोडा (ता.मुल, जि.चंद्रपूर) येथील वितरण पाईपलाईनसाठी अंदाजपत्रकानुसार निधी तातडीने उपलब्ध होण्याबाबत स्थानिक प्रतिनिधींनी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांना दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०७-०९-२०२०) :** (१) हे खरे आहे,

(२) मुल ग्रीड पाणी पुरवठा योजनेत मारोड या गावाचा समावेश असला तरी गावातील वितरण व्यवस्थेचा समावेश मुळे मंजुर प्रस्तावात नाही. मात्र मारोडा ग्रामपंचायतीने यासंदर्भातील ठराव व मागणी त्यांच्या दिनांक ०८.०६.२०२० रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे. त्यानुषंगाने मुल ग्रीड पाणी पुरवठा योजनेतील वितरण व्यवस्थेच्या बचतीतून मारोडा गावातील वितरण व्यवस्था टाकण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीमधील जागा आठवडा बाजाराकरीता उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१२) ३१०७ (०३-०४-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) हे गाव मुंबई-गोवा महामार्गावरील ४ हजारहून अधिक लोकसंख्या असलेले गाव असून या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ असल्याने हे गाव प्रकल्पग्रस्त बाधित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे लोटे येथे सुरु करण्यात आलेल्या आठवडा बाजाराची जागा अपुरी असल्याने सध्या सुरु असलेल्या आठवडा बाजारालगत असलेला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मालकीचा मोकळा प्लॉट (क्र.ए-३/२/१ क्षेत्र ३५०७ एम २) कायमस्वरूपी मिळण्याची मागणी आठवडा बाजार समिती, लोटे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने औद्योगिक वसाहतीमधील जागा आठवडा बाजाराकरीता उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०४-०९-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) बिगर औद्योगिक वापरासाठी जसे,पोलीसचौकी, अग्निशमन केंद्र, दूरध्वनी केंद्र इ.करीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून जागेचे वाटप करण्यात येते. आठवडा बाजाराकरीता जागा उपलब्ध करून देण्याचे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे धोरण नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेती रस्त्यांसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करुन निधी उपलब्ध करणेबाबत

**(१३) ३१७६ (१४-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेती रस्त्यांसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष व निधी उपलब्ध नसल्यामुळे शेतक-यांना शेतमाल वाहतूकीमध्ये अनेक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करुन निधीची उपलब्धता करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०४-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) शेत पाणंद रस्त्यांसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोनसरी (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथे पोलाद कारखाना सुरु करणेबाबत**

**(१४) ३२९५ (०३-०४-२०२०). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोनसरी (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथे पोलाद कारखाना सुरु करण्यास लायडस मेटल ॲण्ड कंपनीला तत्कालीन राज्य शासनाने सन २०१६ मध्ये मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार लायड्स मेटल ॲन्ड कंपनी द्वारा या पोलाद कारखान्याचे भूमिपूजन तत्कालिन मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी प्रकल्प बाधीत शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला देखील तत्कालिन मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते वितरीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पोलाद कारखाना सुरु करून जिल्ह्यातील तरुणांना तसेच स्थानिकांना रोजगार मिळणार असल्याने कारखाना सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०४-०९-२०२०) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) पोलाद कारखाना सुरू झाल्यानंतर ज्या कास्तकरांची २ हेक्टर पर्यंत जमिन संपादीत करण्यात आली,अशा कास्तकरांच्या १ कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरीत प्राधान्य देण्याचा विचार करण्यात येईल असे दि.०६.०५.२०१७ रोजीच्या वाटाघाटीच्या सभेमध्ये कंपनीच्या व्यवस्थापकाने सांगितल्याप्रमाणे ठरले आहे. ५०.२९ हे.आर खाजगी जमिनीचा ताबा महामंडळास दि.०७.०६.२०१८ रोजी प्राप्त झाला असून सदर जमिनीचे लायडस मेटल अँड कंपनी यांना वाटप करून आगावू ताबा दि.२४.०८.२०१८ रोजी देण्यात आला आहे. प्राथमिक करारनामा दि.३१.११.२०१८ रोजी कंपनीस देण्यात आला आहे.

---

**राजुरा, कोरपना, गोंडपिपरी व जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यांतील अनेक ठिकाणी पांदण रस्ते योजना राबविण्याबाबत**

**(१५) ३४७२ (१४-०४-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा, कोरपना, गोंडपिपरी व जिवती (जि.चंद्रपूर) या तालुक्यांतील अनेक ठिकाणी पांदण रस्ते योजना राबविण्याचे शासनाने आश्वासन देऊनही अनेक ठिकाणांचे रस्ते अद्याप झालेले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारपेठेत पोचण्यास विलंब होत असल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेवुन निधीची तरतुद करून राजुरा, कोरपना, गोंडपिपरी व जिवती या तालुक्यांतील प्रत्येक गावांमध्ये पांदण रस्ते योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०४-०९-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) पालकमंत्री शेत /पाणंद रस्ते योजना शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ मधील भाग ब नुसार चंद्रपूर जिल्हयास रु.१५०.०० लक्ष इतका निधी देण्यात आला होता. त्यानुसार प्रति तालुका रु.११.५३ लक्ष प्रमाणे निधी वितरीत करण्यात आलेला होता. त्यापैकी रु.१४.९७ लक्ष खर्च झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील हुंडाबळी पिडितांना नोकरीची सवलत देण्याची होत असलेली मागणी**

**(१६) ३६१२ (१३-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महिलांवर होत असलेल्या ॲसिड हल्ले व बलात्कार इतकाच हुंडाबळीचा विषय गंभीर असून हुंडाबळी पिडितांना नोकरीची सवलत व अपंग विभागात राखीव सवलत देण्याची मागणी शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०४-०९-२०२०) :** (१) हुंडाबळी पिडितांना नोकरीची सवलत व अपंग विभागात राखीव सवलत देण्याची मागणी अप्राप्त आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) येथे नवीन जिल्हा न्यायालय सुरु करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत**

**(१७) ३७०४ (१६-०३-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) येथे नवीन जिल्हा न्यायालय सुरु करण्याच्या प्रस्ताव मा.उच्च नायालयाच्या शिफारशीने मंत्रालयात आवक क्रमांक - २०११/दिनांक १४.०३.२०१९ या क्रमांकाने सादर झालेला आहे, हे खरे हे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०४-०९-२०२०) :** (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.१४/०३/२०१९ रोजी पुणे जिल्हयातील दौंड येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्याच्या अनुषंगाने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, पुणे यांना पत्र पाठविले आणि दि. १३/१२/२०१९ रोजी शासनास प्रस्ताव पाठविला, तर दि. १९/०६/२०२० रोजी अतिरिक्त माहिती पाठविली आहे.
(२) सदर प्रस्ताव वित्त विभागास पाठविला असता शासन निर्णय, वित्त विभाग दि.०४/०५/२०२० आणि राज्याची आर्थिक स्थिती विचारात घेता तुर्तास सदर निर्णय पुढे ढकलणे योग्य राहील असे मत प्राप्त झाले आहे व ही बाब दि.१०/०८/२०२० रोजी मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात पांदण रस्ते योजना राबविण्याबाबत**

**(१८) ३८०२ (१६-०४-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयात पांदण रस्ते योजना राबविण्याचे शासनाने आश्वासन देऊनही अनेक ठिकाणचे रस्ते अद्यापही झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतमाल बाजारपेठेत वेळेत पोहचण्यास विलंब होत असल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन अमरावती जिल्हयात तात्काळ पांदण रस्ते योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०३-०९-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) अमरावती जिल्हयातील पांदण रस्त्याकरीता सन २०१९-२०२० मध्ये रु.५,६१,११,४५४/- एवढा प्राप्त निधी ७ उपविभागास वितरीत करण्यात आला असून मोठया प्रमाणावर पांदण रस्त्यांची कामे प्रगती पथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यात वादळाने तेथील वृक्ष व पिके यांचे झालेले नुकसान व घरांची झालेली पडझड**

**(१९) ४०२० (१०-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यात येथे वादळाचा मोठा तडाखा बसल्याने वृक्ष दुष्काळी परिस्थितीमुळे वाचलेली पिके यांवर घरांची छपरे पडून घरांची पडझड झाल्याचे दिनांक १ जून २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक पदाधिकाऱ्यांसोबत अधिकाऱ्यांमार्फत दुष्काळग्रस्त भागात पंचनामा करूनही अद्याप काही भागात मदत मिळाली नसल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदारांकडून अपूर्ण घरे लाभार्थ्यांना हस्तांतरित केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधीच्या अभावी सदर मदत अपूर्ण असल्याचे अधिकाऱ्यांमार्फत सांगितले जात आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास,याबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०३-०९-२०२०) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

दि.०३.०६.२०१९ रोजी माळशिरस तालुक्यामध्ये वादळी वाऱ्यामुळे ४६७ घरांची पडझड झालेली होती.

(२) हे खरे नाही.

माळशिरस तालुक्यामध्ये खरीप २०१८ हंगामामध्ये गंभीर स्वरूपाचा दुष्काळ जाहिर करण्यात आला असून खरीप हंगामामध्ये दुष्काळग्रस्त ९३९० खातेदारांना रूपये ५.४० कोटी इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

तसेच घर पडझड झालेल्या ३४४ पात्र खातेदानांना रूपये २०,३६,७००/- इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील धरणातील पाणी क्षमता वाढविणेसाठी धरणातील गाळ काढण्याबाबत**

**(२०) ४३५८ (१६-०४-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील घोड धरणातील साठलेल्या गाळावर नाशिक येथील महाराष्ट्र अभियांत्रीकी संशोधन संस्था (मेरी) यांनी जलाशयाच्या साठवण क्षमतेचा अभ्यास केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घोड धरणाची एकुण साठयाची प्रकल्पीय क्षमता ७.७३ अब्ज घनफुट (टीएमसी) होती, गाळामुळे त्यात ४.८७ अब्ज घनफुटापर्यंत घट म्हणजे तब्बल १.७० टीएमसी पाणीसाठी घटला असा अहवाल मेरी संस्थेने घोड जलसंपदा विभागाकडे दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहवाल आल्यानंतर घोड जलसंपदा विभागाने धरणसाठयाच्या आकडेवारीत बदल केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धरणाची पाणी क्षमता वाढविण्यासाठी धरणातील गाळ काढण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०४-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

घोड धरणाचे गाळ सर्वेक्षण महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, मेरी, नाशिक या संस्थेमार्फत २०१० साली करण्यात आलेले आहे.
(२) होय, हे खरे आहे.

घोड धरणाचा प्रकल्पीय एकुण पाणीसाठा ७.६३८ टिएमसी आहे. मेरी, नाशिक या संस्थेमार्फत प्राप्त अहवालानुसार सदर साठयामध्ये एकुण १.३५९ टिएमसी (४७ द.ल.घ.मी.) घट झाली असुन एकुण पाणीसाठा ५.९७८ टिएमसी झालेला आहे.
(३) होय, हे खरे आहे.

घोड जलाशयाच्या साठवण क्षमतेत झालेल्या बदलानुसार प्राथमिक सिंचन कार्यक्रम तयार करुन पाण्याचे नियोजन करण्यात येते.
(४) धरणाची पाणीक्षमता वाढविणेसाठी धरणातील गाळ काढण्यासाठी ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र गामुध २०१७/प्र.क्र.१३४/ जल-१, दि. ०६ मे २०१७ व जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र. लाक्षेवि २०१७/(६७/२०१७) लाक्षेवि (आस्था), दिनांक २४ मे २०१७ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

घोड धरणातून गाळ उचलुन शेतीसाठी वापरणेबाबत लाभधारकांकडून अद्याप मागणी प्राप्त झालेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील भिमा व घोड नदीवर बुडीत बंधारे बांधणेबाबत

**(२१) ४३६० (१६-०४-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील गावांची शेतीसाठी सिंचन व्यवस्था भिमा व घोडनदीवर मोठया प्रमाणावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ च्या दुष्काळात भिमा नदी शिरुरच्या पूर्व भागात ब-याच वर्षानंतर पहिल्यांदाच कोरडी पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शेतक-यांची कोटयवधी रुपयांची पिके जळाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतक-यांकडून बुडीत बंधारे नदीवर बांधणेसाठी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भिमा व घोड नदीवर बुडीत बंधारे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-०९-२०२०) :** (१) हे अंशतः खरे आहे. शिरुर तालुक्यातील सिंचन व्यवस्था घोड व भिमा नदीबरोबरच चासकमान प्रकल्पाचा डावा कालवा तसेच मोटेवाडी व आलेगाव पागा लघु पाटबंधारे तलाव इ. वर अवलंबून आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) तत्कालिन मा.विधानसभा सदस्य (शिरुर), श्री.बाबुराव पाचर्णे यांनी त्यांचे दिनांक ०२/०७/२०१९ चे पत्रान्वये तत्कालिन मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचेकडे मौजे गणेगाव दुमाला ता.शिरूर जि.पुणे येथे भिमा नदीवर बुडीत बंधारा होणेसाठी सर्वेक्षण करणे तसेच त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

(५) भिमा नदीवरील सर्व को. प. बंधारे साखळी पध्दतीने सलग बांधलेले असून नदीच्या डाव्या व उजव्या तीरावरील सर्व क्षेत्रास सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत असल्यामुळे भिमा नदीवर बुडीत बंधारे बांधण्याची आवश्यकता नाही.

तथापि, घोड धरणाच्या बुडीत क्षेत्रात हिंगणी को.प. बंधाऱ्याचे बांधकाम प्रगतीपथावर असून सदर बंधाऱ्याव्दारे उन्हाळी हंगामाव्दारे ११३२ हेक्टर क्षेत्रास सिंचन लाभ देणे प्रस्तावित आहे. घोड धरणाच्या जलाशयाच्या फुगवट्यात बुडीत बंधाऱ्यांची कोणतीही नविन मागणी सद्य:स्थितीत प्राप्त नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्हयातील यावल-रावेर तालुक्यांमधील पाझर तलवांची दुरुस्ती करणेबाबत

**(२२) ५२५७ (०९-०४-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील यावल-रावेर तालुक्यांमधील पाझर तलावांची दुरुस्ती करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेला असून अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शानास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाझर तलावांची दुरुस्ती तात्काळ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (०३-०९-२०२०) :** (१) हे अंशतः खरे आहे.

यावल-रावेर तालुक्यातील क्षतिग्रस्त योजनांच्या दुरुस्तीची कामे क्षेत्रीय स्तरावर विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आली आहेत.

(२) यावल तालुक्यातील बोरखेडा खु. (भिलाणी) या योजनेच्या दुरुस्ती कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त असुन कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदर दुरुस्ती काम पुर्ण करण्याचे नियोजन विभागाने केले आहे.

रावेर तालुक्यातील पाझर तलाव जानोरी, पाझर तलाव सहस्त्रलिंग, पाझर तलाव जिन्सी या योजनांची दुरुस्तीची अंदाजपत्रके मृद व जलसंधारण विभागाच्या सन २०१८-१९ दरसूची नुसार अद्यायावत करुन प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

याशिवाय जलसंधारण कामांचा दुरुस्ती कार्यक्रम २०२०-२१ अंतर्गत यावल-रावेर तालुक्यातील दुरुस्ती कामे निधीच्या उपलब्धतेनुसार आराखड्यात समाविष्ट करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील वरखेडे लोंढे प्रकल्पाचा समावेश बळीराजा जलसंजिवनी योजनेमध्ये करणेबाबत**

**(२३) ५२६१ (१०-०४-२०२०). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील वरखेडे लोंढे प्रकल्पाचा समावेश केंद्र शासन व राज्य शासन यांच्या एकत्रित "बळीराजा जलसंजिवनी योजना" यामध्ये आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरखेडे लोंढे बॅरेज प्रकल्पाचे संपूर्ण सिंचन पारंपारिक कालवा वितरण प्रणाली ऐवजी बंद नलिकेद्वारे सिंचन वितरण प्रणालीद्वारे करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०४-०९-२०२०) :** (१) होय.

(२) दिनांक १४/०२/२०२० रोजी लेखी निवेदन प्राप्त झालेले आहे.

(३) प्रकल्पाच्या सुप्रमा मधील तरतूदीनुसार प्रवाही सिंचन योजना व मागणीकृत बंद नलिकेद्वारे सिंचन वितरण प्रणाली यांचा आर्थिक व तांत्रिक व्यवर्हातेचा तुलनात्मक अभ्यास सक्षम स्तरावर व मान्यतेबाबतचा अभ्यास क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील बोरिवली येथील गोराई जेट्टी व परिसराचा पर्यटनदृष्टया विकास करणेबाबत

**(२४) ५६३९ (१३-०४-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील बोरिवली येथील गोराई परिसरात जागतिक दर्जाचे पगोडा, वॉटर किंगडम व एसएल वल्ड उभारण्यात आले असून या पर्यटनस्थळाला देश-विदेशातील असंख्य पर्यटक येत असुन या पर्यटन स्थळाला भेट देण्यासाठी गोराई जेट्टी येथून बोटीने प्रवास करावा लागत असून या जेट्टीची दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, या गोराई जेट्टीला कांदळवन असून या खाडीत शहरातील मलःनिसारणाचे पाणी सोडण्यात येत असल्याने हे कांदळवन नष्ट होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उपनगर जिल्हयांची जिल्हा वार्षिक योजनेची दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत गोराई जेट्टी व परिसराचा पर्यटनदृष्टया विकास करण्याकरिता किती रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(४) असल्यास, या निधीअंतर्गत कोणकोणत्या विकास कामांचा समावेश करण्यात येणार आहे ?

**श्री. अस्लम शेख (०५-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशतः खरे आहे. मुंबई महानगरपालीकेकडून प्राप्त माहितीनुसार उत्तरामध्ये काही प्रमाणात मलजल प्राथमिक प्रक्रीया करून गोराई खाडीला मिळणा-या नाल्यामध्ये उत्सर्जित करीत असल्याचे नमूद केले आहे. तसेच, कांदळवन क्षेत्रातीकडील प्राप्त माहितीनुसार मालाड अंतर्गत उदंचन केंद्र (आय.पी.एस.) व मालाड मलजल प्रक्रिया केंद्र यांची नव्याने उभारणी व कार्यान्वित केल्यानंतर गोराई खाडीकडे मलनि:स्सारण सांडपाण्यामुळे वनविभागाच्या (कांदळवण कक्षाच्या) ताब्यातील क्षेत्रात कांदळवन नष्ट झाल्याचे दिसून आलेले नाही.

(३) व (४) गोराई नजीक बोरीवली येथे जेट्टीजवळ टर्मिनल बिल्डींग व इतर सुविधा तयार करणे या कामाच्या रु.२४२.४७ लाख इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

तसेच, केंद्र शासनाच्या सागरमाला योजनेअंतर्गत, गोराई नजीक बोरीवली येथे रो-रो जेट्टी बांधण्याच्या रु.१५.४७ कोटी खर्चाच्या कामास प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली असून सदर प्रकल्पास पर्यावरण विभाग आणि कांदळवण कक्षाकडून परवानगी प्राप्त झाली असून काम प्रगतिपथावर आहे.

तसेच कांदळवन विभागाच्या दि.१८.०२.२०२० अन्वये प्राप्त माहितीनुसार, जिल्हा नियोजन समिती, मुंबई उपनगर यांचे दि.८.७.२०१९ च्या आदेशान्वये, जिल्हा वार्षिक योजना २०१९-२० अंतर्गत बोरीवली येथील कांदळवन (खारफुटी) उद्यान विकसित करणे या कामास रु.२५३०.१० लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, हे काम कांदळवन कक्षामार्फत करण्यात येत आहे. ह्या प्रकल्पांमध्ये, निसर्ग परिचय केंद्र, मॅन्ग्रोव्ह ट्रेल, पक्षी निरिक्षण मनोरा, होडी पर्यटन इ. सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

---

**बहुळा प्रकल्प (ता.पाचोरा-भडगांव, जि.जळगांव) या कालव्यावरील अपूर्ण कामे पूर्ण करणेबाबत**

**(२५) ५७५६ (१०-०४-२०२०). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहुळा प्रकल्प (ता.पाचोरा-भडगांव, जि.जळगांव) या कालव्यावरील अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरिता आवश्यक भूसंपादन करावे व कालव्याची कामे त्वरित पूर्ण करण्यात यावी असे निर्देश तत्कालिन जलसंपदा मंत्री यांनी दिनांक ३ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्देशानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०४-०९-२०२०) :** (१) होय.

(२) काही वितरण व्यवस्थेमधील कामासाठीच्या भुसंपादनासाठी शेतकऱ्यांचा विरोध होता आता भुसंपादन झालेले आहे. त्यास अनुसरुन प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत कामे हाती घेऊन निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राई (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) गावालगत असलेल्या धामणी नदीवर**
**'धामणी मध्यम प्रकल्प' पूर्ण करणेबाबत**

**(२६) ६१८४ (१०-०४-२०२०). श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर) (करवीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राई (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील शेतकऱ्यांना उपयुक्त असलेल्या राधानगरी तालुक्यातील धामणी नदीवरील ३.८५ टीएमसी क्षमतेचा धामणी मध्यम प्रकल्प गेली २३ वर्ष प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाचा येथील शेतकऱ्यांना उपयोग होणार असल्याने सिंचन, उद्‌योग, वीज निर्मिती व पिण्यासाठी या पाण्याचा वापर होणार असून या प्रकल्पामुळे धामणी खोऱ्यात विकासाला चालना मिळणार असल्याने हा प्रकल्प तात्काळ पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०४-०९-२०२०) :** (१) होय.

(२) १. प्रकल्पाची सद्‌यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

धरण-७३% पूर्ण, को.प. बंधारे एकूण १०, ६ पूर्ण, उर्वरित ४ पैकी एकाची निविदा निश्चीत झाली आहे.

२. सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भूसंपादनाकरिता महसूल विभागास निधी उपलब्ध करून देणेची कार्यवाही सुरु आहे. तसेच पुनर्वसनांतर्गत १२३ प्रकल्प ग्रस्तांना देय १२० हे. क्षेत्रापैकी ६६ प्रकल्प ग्रस्तांना ६० हे. पर्यायी जमीन वाटप झाली असून उर्वरित ५७ प्रकल्प ग्रस्तांना ६० हे. जमीन आवश्यक असून त्याबाबतची कार्यवाही महसुल विभागाकडून प्रगतीपथावर आहे. तसेच धरणाच्या उर्वरित कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(३) १. भूसंपदान व पूनर्वसन प्रलंबित प्रश्नी प्रकल्पग्रस्तांनी प्रकल्पाचे कामास केलेल्या विरोधामुळे सन २०१३ पासून प्रकल्पाचे काम बंद आहे. भूसंपादन व पुनर्वसन पूर्ण करण्यासाठी महसूल खात्याशी समन्वयाने प्रयत्न करण्यात येत आहेत.

२.प्रकल्पाच्या द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता शासन निर्णयातील अटीनूसार पुर्वीची निविदा विखंडीत केल्याने कंत्राटदाराने उर्वरित कामाच्या निविदा प्रक्रीयेस न्यायालयाची अंतिरिम स्थगिती मिळवली होती. सद्यस्थितीत मा.न्यायालयाने दि.०७/१२/२०१९ रोजीच्या सुनावणीमध्ये उर्वरित कामाच्या निविदेवरील स्थगिती उठवली असून त्यानुसार कंत्राटदाराने केलेल्या कामाच्या न्यायप्रविष्ठ प्रलंबित दायित्वाची रक्कम रू.१०५.९३ कोटीस महामंडळाच्या नियामक मंडळाची १०३ वी बैठक दिनांक २७ जानेवारी २०२० अन्वये मान्यता दिली असून, सदर रक्कमेपैकी अंतिम देयकानुसार संबधीत ठेकेदारास रक्कम रु.५७.३५ कोटी विभागामार्फत दिनांक ०९/०३/२०२० रोजी NEFT Cheque No. ५६९२२० अन्वये अदा करणेत आली आहे. तसेच स्वामित्व शुल्कापोटी महसुल विभागास, विभागाचे पत्र जा.क्र. मप्रवि-२/ लेशा-४/ १०६४ दिनांक ३१/०३/२०२० नुसार रक्कम रु.४४.१८ कोटी NEFT Cheque No. ५६९२४१ अन्वये वर्ग करणेत आली आहे. त्यानंतर धामणी प्रकल्पाच्या उर्वरित कामाची रु.२७७.०७ कोटी रक्कमेची निविदा सुचना माहे मार्च २०२० मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर निविदा सादर करण्याचा अंतिम दि.०८/०५/२०२० होता, तथापी कोविड २०१९ च्या प्रादूर्भावामुळे सदर निविदा सादर करणेस वांरवार मुदत वाढी देण्यात आल्या असुन सद्यस्थितीत चौथी मुदत वाढ दि. ०३/०८/२०२० पर्यंत देण्यात आली आहे.

---

**महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील झरी-जामणी (जि.यवतमाळ) तालुक्यात १०० पेक्षा अधिक कुमारी माता असल्याबाबत**

**(२७) ६४७५ (२५-०३-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील झरी-जामणी (जि.यवतमाळ) तालुक्यात १०० पेक्षा अधिक कुमारी माता असल्याचे दिनांक १८ डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्हयाचा दुर्गम भागात शिक्षणाचा अभाव, गरीबी आणि कायदयाचे अज्ञान या कारणांमुळे कित्येक अल्पवयीन मुली व अविवाहित महिलांवर जबरदस्तीने मातृत्व लादण्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कुमारी मातांना शासनातर्फे महिन्याला केवळ ४२५ रुपयेच आर्थिक सहाय्य करण्यात येत असून त्यामध्ये १०००/- रुपये पर्यंत वाढ करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कुमारी मातांच्या पुर्नवसनासाठी मोरगाव तालुक्यात पुनर्वसन केंद्र सुरु करण्याचे (तत्कालीन मंत्री) व त्याकरीता मौजे सावरखेडा येथे पाच एकर जमिन देण्यात येवून १४ कोटींचा निधी उपलब्ध न झाल्यामुळे सदर पुनर्वसन केंद्राचे काम अद्याप सुरु करण्यात आले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कुमारी मातांना देण्यात येणाऱ्या मानधनाचे रकमेत वाढ करण्यासह सावरगाव (ता.मोरगाव) येथे पुनर्वसन केंद् सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०४-०९-२०२०) :** (१) नाही.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, यवतमाळ यांच्या कार्यालयाने केलेल्या सर्वेक्षणानुसार झरी-जामणी तालुक्यात सद्य:स्थितीत ३० कुमारीमाता आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नाही.

अशी मागणी शासनास अद्याप प्राप्त झाली नाही.

(४) व (५) होय.

कुमारी मातांच्या पुनर्वसनासाठी मोरगाव तालुक्यातील मौजा टाकरखेडा येथे गट क्र.३४ मधील ५ एकर ई-क्लास जमिन मिळालेली असून या जागेवर बांधकामाचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याला केंद्र शासनाकडून जास्त अनुदान मिळणेबाबत

**(२८) ६८९३ (१६-०४-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील ५ वर्षात राज्याने प्रत्यक्ष करावदारे दिलेल्या महसूलाच्या १० टक्के मोबदलाही केंद्र शासनाकडून राज्याला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्य शासन केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन राज्याला जास्त मदत वा अनुदान मिळावे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०४-०९-२०२०) :** (१) भारतीय संविधानातील तरतूदीनुसार संघ सूचीमध्ये समावेश केलेल्या कर व शुल्क उत्पन्नाचे (निव्वळ रक्कम) वाटप केंद्र व राज्यांमध्ये केले जाते, राज्यांना वितरीत करावयाच्या हिस्स्याची टक्केवारी ही केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार निश्चित करण्यात येते.

त्यानुसार १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार राज्याला केंद्रीय निव्वळ करापैकी राज्याचा हिस्सा ४२ टक्के देण्याचे निश्चित केले होते. सदर ४२ टक्के मधील लोकसंख्या, भौगोलिक बदल, उत्पन्नातील अंतर, क्षेत्र, वनव्याप्त क्षेत्र या घटकांच्या निकषाच्या आधारे महाराष्ट्र राज्यास सेवा करातील ५.६७४ टक्के व सेवा कराव्यतिरिक्त अन्य करातील (आयकर, निगम कर, संपत्ती कर, सीमा शुल्क, केंद्रीय उत्पादन शुल्क, केंद्रीय वस्तु व सेवा कर) ५.५२१ टक्के रक्कम देण्याचे ठरले होते. सदर सुत्राप्रमाणे केंद्र शासनाकडून दरमहा रक्कम प्राप्त झाली. त्यानुसार केंद्र शासनाकडून सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीत एकूण रू.१,७७,१८० कोटी प्राप्त झाले आहेत.

(२) १४ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने केंद्रिय करांतील ४२% हिस्सा राज्याला देण्यात आला. १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाकडे सदर ४२% ऐवजी ५०% कर हस्तांतरण करावे अशी मागणी केली आहे.

राज्याने १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाकडे समस्तर हस्तांतरण लोकसंख्या जनगणना २०११ नुसार (भारांक ३५%), क्षेत्र (भारांक १५%), उत्पन्नातील अंतर तफावत (भारांक १५%), वंचितता (एसईसीसी ग्रामीण) (भारांक १५%),नागरीकरण (भारांक १०%), राजकोषीय कार्यक्षमता (राजकोषीय शिस्त-कर प्रयत्न) (भारांक ७.०५%), वृक्षच्छादित क्षेत्र (भारांक २.०५%) या सुत्रानुसार वाटप करण्याची विनंती केली आहे.

१५ व्या वित्त आयोगाने सन २०२०-२१ या वर्षाकरीता केलेल्या अंतरिम अहवालातील शिफारशीनुसार केंद्र शासनाने केंद्रीय निव्वळ करातील ४१ टक्के हिस्सा राज्यांना देण्याचे निश्चित केले आहे. या ४१ टक्के हिश्श्यापैकी समस्तर हस्तांतरण हे लोकसंख्या (भारांक १५%), क्षेत्र (भारांक १५%), वने व पर्यावरण (भारांक १०%), उत्पन्नातील अंतर (भारांक ४५%), भौगोलिक कार्यक्षमता (भारांक १२.५%), कर वसुलीचे प्रयत्न (भारांक २.५%) या आधारे महाराष्ट्रास ६.१३५ टक्के हिस्सा देण्यात येणार आहे. त्यानुसार केंद्र शासनाकडून रू.४८,१०९ कोटी सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात मिळणे अपेक्षित आहे.

(३) वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

---

**नेर तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील शेतकरी दुष्काळ निधी पासुन वंचित असल्याबाबत**

**(२९) ७३९३ (०९-०४-२०२०). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेर तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी सन २०१८ पासून मदतीपासून वंचित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ मध्ये कोरडा दुष्काळ पडला असल्याने हेक्टरी ६८०० रुपये मदत जाहीर केली असुनही ह्या परिसरातील अनेक शेतकऱ्यांना मदत मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या परिसरातील शेतकऱ्यांनी तात्काळ मदत न मिळाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पकरणी चौकशी करुन सदर शेतक-यांना दुष्काळ निधी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०४-०९-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) खरीप हंगाम २०१८ मधील दुष्काळाच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांना एकूण रू.३८,४२,४६,७०० एवढा निधी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरपूर (जि.वाशिम) येथील अडोळ प्रकल्पाच्या भिंतीवर झाडेझुडपे वाढल्याने या प्रकल्पास धोका निर्माण झाल्याबाबत

**(३०) ७६१५ (१६-०४-२०२०). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरपूर (जि.वाशिम) येथील पाणीपुरवठा करणारे तथा शेतक-यांना सिंचनासाठी उपयुक्त असणा-या अडोळ प्रकल्पाच्या भिंतीवर प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे झाडेझुडपे वाढल्याने या प्रकल्पास धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून या प्रकल्पाच्या भिंतीवरील धोकादायक झाडेझुडपे काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०४-०९-२०२०) :** (१) अडोळ धरणावर काही प्रमाणात झुडपे वाढली होती मात्र त्यापासून धरणास कुठलाही धोका नव्हता.
(२) नियमित देखभाल दुरुस्तीचे सन २०१९-२० च्या नियोजनात अडोळ धरणावरील झुडपे काढण्याचे काम अंतर्भुत होते. त्यानुसार सदरचे काम मार्च २०२० पूर्वी पूर्ण झाले असून सद्यस्थितीत धरणावर कोणतेही झाडेझुडपे नाहीत.
(३) कार्यवाही पूर्ण झाली असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे व औंध (जि.पुणे) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयातील औषधांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३१) ८८४५ (०५-०६-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व औंध (जि.पुणे) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयात औषधांची मुदत संपण्यापूर्वीच औषधे नष्ट करून तीच औषधे बाहेरुन जास्तीच्या दरात विकत घेण्यास भाग पाडुन गैरव्यवहार केलेल्या प्रकरणातील सकृतदर्शनी संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द कारवाई संथगतीने सुरु असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीने चौकशी अहवाल सादर केला असून सदर समितीने पशुवैद्यकीय चिकित्सालय, औंध, पुणे या संस्थेचे स्वतंत्रपणे विशेष पथकाद्वारे लेखापरीक्षण करण्याची शिफारस केलेली असतांना कारवाईची प्रक्रिया अतिशय संथगतीने सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणातील सकृतदर्शनी दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द शिस्तभंग विषयक प्रस्ताव सादर करण्याची सूचना आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे यांना देण्यात आलेल्या असतांना अद्यापपर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०४-०९-२०२०) :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी समितीने त्यांच्या अहवालात शिफारस केल्याप्रमाणे संस्थेचे विशेष लेखा परीक्षण पूर्ण करण्यात आले आहे. प्राथमिक चौकशी अहवाल व लेखा परीक्षण अहवाल यामध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटी व चुका याबाबत घटनेशी संबंधित सर्वांची संयुक्त विभागीय चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, त्याबाबत पुढील कार्यवाही सत्वर करण्यात येत आहे.

(५) लागू नाही.

---

**लॉकडाऊन काळात केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे उपलब्ध झालेले धान्य रेशनवर एकाच हप्त्यात व विनाअट वितरित होण्याबाबत**

**(३२) ८८६५ (३०-०५-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लॉकडाऊन काळात केंद्र शासनाने दिनांक ८ मे, २०२० रोजी तीन महिन्यांचे रेशन मोफत देण्यात यावे अशी घोषणा करून धान्य वितरण खर्चासह २० लाख मेट्रिक टन धान्य साठा राज्याला पुरविला असून अंत्योदय, प्राधान्य गट व शेतकरी यांना सवलतीच्या दरात प्रति व्यक्ती ५ किलो तर माहे मे, जून व जुलै या महिन्यात प्रति व्यक्ती ५ किलो गहू व तांदूळ मोफत देण्याची घोषणा करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून तीन महिन्यांचे रेशन न देता केवळ एका महिन्याचेच रेशन देत आहे तसेच जर मागचे तीन महिने रेशन घेतले नसेल तर किंवा अन्न सुरक्षा योजनेतील धान्य खरेदी केले नसेल तर रेशन दिले जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाच्या कोणत्याही अटी नसतांना राज्य शासन मात्र दिनांक १९ व ३१ मार्च, २०२० रोजी सूचना देऊन वेगवेगळया अटींसह गरिबांची अडवणूक करित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केंद्र शासनाकडून उपलब्ध झालेल्या धान्याचे संबंधितांना एकाच हप्त्यात व विनाअट त्वरित वाटप होण्याच्या दृष्टीने तसेच ज्यांच्याकडे रेशन कार्ड नाही त्यांना आधार कार्डवर व ज्यांच्याकडे दोन्ही नाही अशांची यादी साक्षांकित करून त्यांना रेशन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, केंद्र शासनाच्या निर्णयानुसार राज्य शासनाने माहे मे, २०२० अखेर पर्यंत राज्यातील एकूण किती कोरोना बाधीत रुग्णांच्या कुटुंबांना धान्य पुरवठा केला आहे व किती कोरोना बाधित कुटुंबांना मोफत धान्य पुरवठा करणे प्रलंबित आहे,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१५-०७-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठी प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेंतर्गत माहे एप्रिल, २०२० ते जून, २०२० या कालावधीकरिता प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो तांदुळ व प्रतिमाह प्रति कुटुंब १ किलो डाळ मोफत वितरणासाठी उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्याकरिता उपरोक्त कालावधीकरिता १०,५०,००० मे. टन तांदुळ व ४८००० मे. टन डाळी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेंतर्गत माहे एप्रिल, २०२० ते जून, २०२० या कालावधीकरिता प्राप्त झालेल्या तांदळाचे सर्व पात्र लाभार्थ्यांना मोफत वितरण करण्याबाबत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे त्या-त्या महिन्याचे वितरण आहे.

केंद्र शासनाच्या आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत राज्यातील विनाशिधापत्रिकाधारक, स्थलांतरित मजूर इत्यादींना माहे मे व जून, २०२० या कालावधीकरिता प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो तांदुळ व प्रतिकुटुंब १ किलो अख्खा चणा मोफत वितरीत करण्यात येत आहे.

(५) कोरोना बाधित रुग्णांच्या कुटुंबांना वेगळ्याने अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबत केंद्र शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जवखेडे खालसा (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील मुळा डाव्या कालव्यावरील पुलाची पुर्नबांधणी करणेबाबत

**(३३) ९६३८ (२८-०५-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवखेडे खालसा (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील कोपरे ते हनुमान टाकळी रस्त्यावरील चाळीस वर्षापूर्वी बांधलेल्या मुळा डाव्या कालव्यावरील पुलाची दुरवस्था झाल्याने सदर पुल वाहतूकीस धोकादायक असल्याची बाब दिनांक १४ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हनुमन टाकळी, कोपरे, वाघोली या गांवासह शेगाव तालुक्याच्या ठिकाणी जाणाऱ्या मुख्य मार्गावर हा पूल असल्यामुळे या रस्त्यावर जड व हलक्या वाहतुकीचे प्रमाण जास्त असून विद्यार्थीही या पुलावरुन ये-जा करत असल्याने या पुलाची तात्काळ पुर्नबांधणी करावी अशी मागणी संबंधित गावांच्या सरपंचानी पाटबंधारे विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास,त्यानुसार सदर पुलाची तात्काळ पुर्नबांधणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०४-०९-२०२०) :** (१) होय.
(२) होय.
सरपंच व ग्रामस्थ यांनी कार्यकारी अभियंता यांचेकडे दि.१४.०३.२०२० रोजीच्या प्रत्यक्ष पाहणीसमयी तोंडी मागणी केली आहे.
(३) होय.

सदर पुलाची पाहणी करण्यात आली असून सदरचा पूल मोडकळीस आलेला असल्यामुळे सदर पुलाचे नव्याने बांधकाम करणे आवश्यक आहे.
(४) सदर पुलाचे बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सक्षम स्तरावरुन मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.निधी उपलब्धतेनुसार पुलाचे काम त्वरीत हाती घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा परिषदेच्या ६०३ शाळांचा वीज पुरवठा पूर्ववत करणेबाबत**

**(३४) ९६४४ (०३-०६-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या शाळा १०० टक्के डिजिटल असताना दुसरीकडे शाळेचे वीज देयके थकित असल्याने जिल्हयातील तब्बल ६०३ शाळांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच वीज नसल्याने इलेक्टॉनिक उपकरणे वापराविना पडून असून थकित वीज देयके सेवा निधीतून भरण्यात यावीत व अनुदान मूल्यनिर्धारण न केल्याने जिल्हयाला सादिल मिळत नाही तो मिळावा अशी मागणी जिल्हा परिषदेच्या सदस्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त मागण्या पूर्ण करण्यासह सदर शाळांचा वीज पुरवठा पूर्ववत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०९-२०२०) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अहमदनगर जिल्ह्यामधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची वीज देयके १४ व्या वित्त आयोगातून संबंधित ग्रामपंचायतीने अदा करणेबाबत जिल्हा परिषद स्तरावरुन सर्व ग्रामपंचायत कार्यालयास कळविण्यात आले आहे.

(४) अहमदनगर जिल्ह्यामधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची वीज देयके १४ व्या वित्त आयोगातून संबंधित ग्रामपंचायतीने अदा करण्याबाबत जिल्हा परिषद स्तरावरुन सर्व ग्रामपंचायत कार्यालयास कळविण्यात आले असून ७१ ग्रामपंचायत कार्यालयाकडून वीज देयके भरण्यात आली आहेत. तसेच समग्र शिक्षा अंतर्गत संयुक्त शाळा अनुदान वितरित करण्यात आले असून त्यामध्ये वीज देयकाबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(५) निरंक.

---

**जळका (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील पाझर तलावाचे काम**
**भुसंपादना अभावी सुरू झाले नसल्याबाबत**

**(३५) १०८१८ (०३-०६-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळका (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथे जिल्हा परिषद सिंचन विभागामार्फत पाझर तलावाच्या कामाकरीता निधी मंजुर झाला असताना तलावाकरिता लागणा-या जमीनीच्या भुसंपादना अभावी पाझर तलावाचे काम प्रलंबित असल्याचे दिनांक २० मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील पाण्याच्या पातळीत वाढ झाल्यास शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी उपयुक्त ठरुन दुष्काळ परिस्थिती निर्माण होणार नाही यासाठी सदहू सिंचन तलावा मंजुर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भुसंपादन करुन मंजुर पाझर तलावाचे काम पुर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (०३-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.
मौजे जळका (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील पाझर तलावाच्या कामाकरिता कुठल्याही प्रकारचा निधी मंजुर करण्यात आलेला नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हवेली (जि.पुणे) पंचायत समिती अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत

**(३६) ११३७९ (१५-०८-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) पंचायत समिती अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम योजनेत समाविष्ट असलेल्या गावांमध्ये भीषण पाणी टंचाई असून टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम योजनेची सन २०१८ पासून अद्यापपर्यंत करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत ग्रामीण पाणी पुरवठा बांधकाम उपविभाग, पंचायत समिती हवेली यांच्याकडे वारंवार बैठका घेऊन व पत्राद्वारे पाठपुरावा केला जात असूनही संबंधित विभागाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०३-०९-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.
सन २०१९-२० मध्ये टंचाई कालावधीत ७ गावे टँकरग्रस्त होती. सद्यस्थितीत एकही टँकर चालू नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

(४) सध्या चालू असलेली कामे निविदेत समाविष्ट असलेल्या तांत्रिक निकषा प्रमाणे व योग्य दर्जाप्रमाणे करण्यात येत असल्याने चौकशी करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यातील शासकीय जमिनींचा आणि मालमत्तांचा विकास करणेबाबत**

**(३७) ११७०२ (१९-०७-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यातील शासकीय जमिनींचा आणि मालमत्तांचा पर्यटनदृष्ट्या खाजगीकरणातून विकास करण्याचा निर्णय दिनांक २५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०४-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्य मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार दि. १७.०८.२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर येथील कंत्राटी कनिष्ठ अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांचेवर कारवाई करणेबाबत**

**(३८) ११९०८ (१५-०८-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील नळपाणी पुरवठा योजनेंतर्गत जव्हार व मोखाडा विभागात ई निविदेमार्फत कामे घेणाऱ्या एजन्सीने कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांच्याशी संगनमत करून अनुभवाचा बोगस दाखला घेवून काम मिळविल्याची बाब सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीने कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांचेवर ठपका ठेवत त्यांना माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दोषी ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालिन कार्यकारी अभियंता, यांनी कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांच्याविरूध्द करण्यात येत असलेल्या कारवाईकडे हेतु:पुरस्सरपणे दुर्लक्ष करून त्यांच्या पुनर्नियुक्तीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी अभियंते व ठेकेदार तसेच अन्य दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२५-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांचा पुनर्नियुक्तीचा आदेश दिनांक १३.०७.२०२० रोजी रद्द केला आहे.

(४) सदर प्रकरणी दोषी आढळलेल्या ठेकेदाराचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक रोड यांना दिनांक १९.०५.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच ठेकेदाराचे जिल्हा परिषद, बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र दिनांक ०६.०७.२०२० रोजी रद्द करण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांचा पुनर्नियुक्तीचा आदेश दिनांक १३.०७.२०२० रोजी रद्द केला आहे. तसेच सेवानिृत्त कार्यकारी अभियंता यांच्या विरुद्ध नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली जिल्हयातील पिण्याच्या पाण्याचे नमुने अनुजैविक तपासणीमध्ये दुषित आढळून आल्याबाबत

**(३९) ११९६८ (१५-०८-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील अनुजैविक तपासणीमध्ये अनेक ठिकाणचे पाणी नमुने दुषित व पिण्यास अयोग्य असल्याचे दुय्यम निष्कर्ष तपासणी अहवालात नमुद असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहर व गावांमध्ये दुषित पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांना भविष्यात जलजन्य आजार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत हिंगोली जिल्हा परिषद प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०७-०९-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात जिल्हयातील १२ गावातील २२ स्त्रोताचे पाणी नमुने तपासण्यात आले, त्यापैकी एकही नमुनादूषित आढळलेला नाही. तथापि माहे जानेवारी-२०२० या महिन्यात ५२८ स्त्रोताचे पाणी नमुने तपासण्यात आले, त्यापैकी ४८ गावातील ६६ नमुने दुषित आढळून आलेत.

(२) व (३) माहे माहे जानेवारी-२०२० मध्ये दुषित पाणी नमुने आढळून आलेल्या गावातील स्त्रोतांचे ग्रामसेवक व जलसुरक्षकामार्फत ३३% क्लोरिनयुक्त टी.सी.एल. पावडरद्वारे शुध्दीकरण करुन घेण्यात आले आहे. तसेच स्त्रोता भोवतालचा परिसर स्वच्छ करण्यात आलेला असून सद्य:स्थितीत नागरिकांना नियमित स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

गावामध्ये स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने नागरिकांना भविष्यात जलजन्य आजाराचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालपूर (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथील अमरावती मध्यम प्रकल्पाच्या पाटचा-यांच्या दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४०) १२२१४ (१०-०८-२०२०). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालपूर (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथील अमरावती मध्यम प्रकल्पात सन २०१९ मध्ये १०० टक्के जलसाठा होता पंरतु डाव्या आणि उजव्या कालव्याच्या पाटचा-या दुरूस्त नसल्यामुळे कोणत्याही शेतक-यांना सिंचनाचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती प्रकल्पासाठी शासनाने कोटयवधी रूपये खर्च करून प्रकल्प उभारला असुन पाटचा-या देखील केल्या आहेत पंरतु केवळ दुरूस्तीसाठी लागणा-या निधी अभावी शेतक-यांना सिंचनाचा लाभ न झाल्याचे माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पातील अधिका-यांनी शासनाकडे पाटचा-या दुरूस्ती करण्याबाबत प्रस्ताव सादर केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सबंधीत अधिका-यांवर कारवाई करण्यासह सदर प्रकल्पाच्या पाटचा-याच्या दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०४-०९-२०२०) :** (१) अमरावती मध्यम प्रकल्पासाठी सन २०१९-२० मध्ये १०० टक्के पाणीसाठी झालेला होता. उपलब्ध पाण्यावर लाभधारकांच्या प्राप्त मागणीनुसार कालव्यावर १८६ हेक्टर ऐवढया क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यात आला असून २६३८ हेक्टर

ऐवढया क्षेत्रास विहीरीद्वारे सिंचनाचा लाभ झालेला आहे. त्यामुळे कालव्याच्या पाटचा-या दुरुस्त नसल्यामुळे कोणत्याही शेतक-यांना सिंचनाचा लाभ मिळालेला नाही, हे खरे नाही.
(२) सिंचनासाठी उपलब्ध निधीतून आवश्यकतेनुसार पाटचा-यांची दुरुस्ती करण्यांत आलेली आहे व लाभधारकांच्या प्राप्त मागणीनुसार सिंचनाचा लाभ शेतक-यांना देण्यांत आलेला आहे. त्यामुळे शेतक-यांना सिंचनाचा लाभ मिळालेला नाही, हे खरे नाही.
(३) सन २०१९-२० मध्ये उपलब्ध निधीनुसार प्रकल्पाच्या पाटचा-यांची दुरुस्ती यांत्रिकी विभागाच्या पाखरण कार्यक्रमांतर्गत व जलसंपदा विभागाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी प्राप्त निधी अंतर्गत सदर कालव्यांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे पाटचा-यांची दुरुस्ती विशेष दुरुस्ती अंतर्गत करणे आवश्यक नसलेने प्रस्ताव सादर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्यातील गुटखा विक्री करण्याऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४१) १२२४५ (१५-०८-२०२०). श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गुटखा बंदी असतांना नांदेड जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागात विशेषतः देगलूर व बिलोली तालुक्यात तसेच कहाळा बु., नरसी फाटा व पिंपळगाव (ता.नायगाव), भोकर, कंधार व वाई बाजार (ता. माहूर) येथे तंबाखु जन्य पदार्थ व गुटख्याची विक्री अनेक लहान मोठ्या दुकानांमध्ये होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदेड येथील जुन्या मोढ्यातून पोलिस व अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने छापा टाकून ७०,००० रूपयांचा साठा व कहाळा बु. (ता.नायगाव) येथे कुंटुर पोलिसांनी गुटखा विक्रेत्याला ताब्यात घेऊन ६,५०० रुपयांचा गुटखा जप्त केल्याचे दिनांक १२ जानेवारी २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गुटखा विक्रीवर आळा घालण्याची जबाबदारी तेथील अन्न व औषध प्रशासनाची तसेच स्थानिक पोलिसांची असतानाही गुटखा विक्रेत्यांवर कोणतीही कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गुटखा बंदीच्या काटेकोर अंमलबजावणीकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई करणे तसेच नांदेड जिल्ह्यात पूर्णतः गुटखा बंदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०३-०९-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) जुना मोंढा, नांदेड येथे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दि. १८.११.२०१९ रोजी धाड टाकून रु. ६९,७०५/- चा प्रतिबंधित अन्नसाठा जप्त केला आहे.

तसेच कहाळा बु. ता.नायगांव येथे दि. ०८.०१.२०२० रोजी कुंन्टूर पोलीसांनी रु. ६४८०/- चा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त केला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील बंद पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(४२) १२३०२ (१९-०७-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील १३५ पाणी पुरवठा योजना बंद असल्याने पाणी टंचाई निर्माण होऊन नागरीकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजना किती कालावधीपासून बंद आहे तसेच ती बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर पाणीपुरवठा योजना सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०३-०९-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे,

(२) निमगाव गांगर्डा व १७ गावे प्रादेशिक योजना, आखोणी व २२ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना देखभाल दुरुस्ती अभावी दि. ०१.०८.२००८ पासून बंद आहेत. पानोडी व ९ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना साठवण तलावाच्या गळतीमुळे सन २००९ पासून बंद आहे. तसेच १३५ स्वतंत्र पाणी पुरवठा योजना सरासरी १ महिना कालावधीसाठी बंद होत्या. भूजल पातळीमध्ये घट झाल्यामुळे, उपलब्ध पाणी कमी पडल्याने, योजनेचे आयुष्यमान संपल्याने, किरकोळ दुरुस्ती, थकित विज देयकामुळे योजना बंद आहेत.

(३) होय.

निमगांव गांगर्डा व १७ गावे योजनेचे काम मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमांतर्गत पुर्नजिवनासाठी मंजूर आहे. आखोणी व २२ गावे योजनेतील गावांच्या अल्प प्रतिसादामुळे योजना आर्थिकदृष्या व्यवहार्य ठरत नाही. पानोडी व ९ गावे योजनेची अपूर्ण कामे महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि. अमृतनगर यांचे सहाय्याने करुन योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.

टंचाई निर्माण झालेल्या ४४ गावे व १८९ वाडयांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला असून जून, २०२० मध्ये पावसामुळे पाणी वाढल्याने या योजना सुरु झाल्या आहेत. किरकोळ दुरुस्ती अभावी बंद असलेल्या योजना दुरुस्ती करुन कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४३) १२३५८ (१४-०७-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील सन २०१८-२०१९ मध्ये मंजूर झालेल्या रमाई आवास योजनेची कामे निधीअभावी प्रलंबित असून संबंधित विभागाचे अधिकारी निधी उपलब्ध नसल्याचे कारण सांगत असल्यामुळे व्याजाने पैसे काढून बांधकाम पूर्ण करणारे लाभार्थी अडचणीत आले असल्याची बाब दिनांक २२ जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनामार्फत वाशीम जिल्हयाच्या रमाई आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना निधी वितरीत करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०४-०९-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

(३) नगरपंचायत, मानोरा यांना सन २०१७-१८ मध्ये ५० घरकुलांचे उद्दीष्टे ठरवून देण्यात आले व ११ घरकुलांकरीता रू.२७.५० लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

तसेच सन २०१८-१९ मध्ये एकूण १५ घरकुले मंजूर करण्यात आले व त्यांना उपलब्ध निधीमधून खालीलप्रमाणे अनुदान वितरीत केले आहे:-

१४ लाभार्थ्यांस ३ हप्ते व एका लाभार्थ्यास १ हप्ता निधी कमी पडत असल्याने, १४ लाभार्थ्यांना प्रत्येकी रू.२५०००/- प्रमाणे रक्कम देणे बाकी आहे व एका लाभार्थ्याने दुसऱ्या हप्त्याकरीता अर्ज केलेला नाही. सन २०१९-२० मध्ये श्रीभाऊ कंटाळे यांचे एक घरकुल मंजूर झाले असून निधी अभावी अनुदान देता आले नाही. तसेच वाशिम नगरपरिषदेकडे शिल्लक असलेल्या निधीमधून रू.१२.५० लक्ष एवढा निधी नगरपरिषद, मानोरा यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे व सदरचा सर्व निधी ज्यांचे देणे बाकी आहे त्यांना यथाशिघ्र वितरीत करण्याच्या सूचना सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, वाशिम यांच्या स्तरावरून देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत नगरपरिषद मानोरा यांनी एकूण १६ घरकुलांना मंजूरी दिली असून त्याकरीता एकूण रू.२७.५० + रू.१२.५० असे एकूण रू.४०.०० लक्ष निधी यापूर्वी वितरीत करण्यात आला आहे. त्यामुळे आता अनुदानापासून एकही लाभार्थी वंचित नाही.

(४) सदर कामाच्या पर्यवेक्षणाकरीता नगरपरिषद, मानोरा यांच्याकडे तांत्रिक कर्मचारी वर्ग नसल्याचे सांगण्यात आले, त्यामुळे त्यांच्या स्तरावरून कार्यवाही करण्यास विलंब होत असल्याचे दिसून येते.

---

**लोणवाडी (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) प्रकल्पाच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(४४) १२६९३ (१०-०८-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटबंधारे विभागाच्या मलकापूर विभाग अंतर्गत लोणवाडी (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) लघुप्रकल्पाच्या कामामध्ये भिंतीला तडे गेल्याने पाझर तलावाच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याने प्रकल्प नादुरुस्त होऊन स्थानिक शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक २० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कामाच्या गैरव्यवहाराबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी तहसीलदार नांदुरा, जिल्हा बुलढाणा यांच्याकडे दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, लोणवाडी लघु प्रकल्पाच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर कारवाई करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०३-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही, तथापि, प्रकल्पाची घळभरणी झाल्यापासून प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा झाला नसल्याने कालव्याव्दारे सिंचन होऊ शकले नाही.

(२) होय, हे खरे आहे. स्थानिक शेतकरी श्री. संतोष शं. डिवरे, यांची दिनांक १७/०४/२०१७ ची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांचेकडे प्राप्त झाली आहे.

(३) महामंडळाने या कामांबाबत चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक करुन सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने कामाची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने कामाची चौकशी करण्यात आली आहे. निकृष्ट काम Tender Clause नुसार पुन्हा दुरुस्त करुन देण्याबाबत संबंधीत कंत्राटदारास पत्राने कळविण्यात आले आहे.

सांडव्याच्या उजव्या भागातील पक्ष भिंतीची कंत्राटदाराने दुरुस्ती करुन दिली आहे. तसेच कालव्यावरील तीन बांधकामे निकृष्ट असल्याचे आढ़ळून आले आहे. परंतु निकृष्ट असलेल्या बांधकामाचे कंत्राटदारास भुगतान करण्यात आलेले नाही.

(४) लोणवडी प्रकल्पाचे मुख्य धरणाचे कामासाठीचे निविदा अंतर्गत कलम-२ अन्वये मंडळ कार्यालयाचे दिनांक १५/१/२०१३ च्या पत्रान्वये दिनांक २१/१२/२०१२ पासून कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही सुरु केली आहे. तसेच दि. ०१/०७/२०१२ नंतर कंत्राटदारास कुठल्याही कामाचे भुगतान करण्यात आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा तालुक्यातील पिपरी (मेघे) व १३ गावांकरिता नवीन पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव मंजूर करणेबाबत**

**(४५) १२७३७ (१५-०८-२०२०). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा तालुक्यातील पिपरी (मेघे ) व १३ गावांना पाणी पुरवठा करण्याकरिता नवीन पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर झाला असल्यास या वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामास सुरवात करण्यात आली आहे काय, या कामाची मूळ मुदत कधीपर्यंत होती व मूळ मुदतीत कंत्राटदाराने काम पूर्ण केले नसल्यास कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर याजनेचा प्रस्ताव मंजूर करुन पाणी पुरवठ्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०७-०९-२०२०) :** (१) सदर योजनेच्या अंदाजपत्रकास दिनांक २०.०२.२०१७ रोजी तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. तसेच दिनांक १९.०४.२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेची कामे पूर्ण करण्याकरिता कंत्राटदारास १८ महिन्यांची मूळ मुदत (दिनांक २१.०६.२०१८ ते दिनांक २०.१२.२०१९) देण्यात आलेली होती.
सदर कालावधीत कंत्राटदाराने कामे पूर्ण न केल्यामुळे कंत्राटदारास दिनांक ११.१०.२०१९ च्या आदेशान्वये रु.२०,०१८/- इतका दंड प्रस्तावित केला आहे.
(२) व (३) होय, प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असून सदर योजना विहित मुदतीत पूर्ण करण्याकरिता झालेला विलंब हा कंत्राटदाराने संथ गतीने केलेले काम, खात्यामार्फत विलंबाने पुरविण्यात आलेले पाईप्स व कंत्राटदारास कामाची देयके प्राप्त होण्यास झालेला विलंब या बाबीमुळे झालेला आहे. सदर कामे पूर्ण करण्याकरिता कंत्राटदारास वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. मात्र कोविड-१९ विषाणूमुळे उद्भावलेल्या परिस्थितीत कंत्राटी मजुरांच्या अनुपस्थित स्थानिक मजुरांकडून जानेवारी २०२१ पर्यंत कामे पूर्ण करण्याबाबत नियोजन करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सालेकसा (जि.गोंदिया) तालुका येथील रमाई योजनेतील घरकुलांचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(४६) १२७५२ (१८-०७-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा (जि.गोंदिया) तालुका येथील रमाई योजनेतील घरकुलाचे काम निधी अभावी अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याची बाब माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८-१९ मध्ये रमाई आवास योजने अंतर्गत एकुण २०० कुटुंबांना पक्की घरे देण्याचे उदिष्ट असताना ते पूर्ण करण्यास संबंधित प्रशासन निधी अभावी अपयशी ठरल्याने ११० कुटुंबांना बांधकामास निधी न मिळाल्याने ऐन पावसाळ्यात घरा विना दिवस काढावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने उर्वरित ११० कुटुंबांना पक्की घरे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०४-०९-२०२०) :** (१) होय.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) रमाई आवास योजना (ग्रामीण) या योजनेंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पंचायत समिती, सालेकसा, जि.गोंदिया येथील एकूण १६८ लाभार्थ्यांना प्रशासकीय मंजूरी दिली आहे. त्यातील ११९ लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याने त्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आला तसेच त्यातील ६५ लाभार्थ्यांना दुसरा हप्ताही दिलेला आहे उर्वरित ५४ लाभार्थ्यांना निधी अभावी दुसरा हप्ता देण्यात आलेला नाही.

सदर योजनेंतर्गत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रू.५००.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. उपरोक्त निधी प्राप्त होताच वितरीत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील फॅट स्प्रेड ॲन्ड अमुल लाइट फॅट स्प्रेड या अन्नपदार्थांचे उत्पादन करणा-या कंपनीचा पेढ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४७) १२८५३ (११-०७-२०२०). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात झीरो कॉलेस्ट्राल, लो फॅट लो कॉलेस्ट्राल अशी उत्पादनांवर जाहिरात करुन उत्पादन विकणे हे अन्न सुरक्षा कायद्याने गुन्हा असल्याने अन्न व औषध प्रशासनामार्फत विशेष मोहिमेअंतर्गत गुप्तवार्ता (अन्न) विभागाने न्युट्रालाईट फॅट स्प्रेड, डिलीसीयस फॅट स्प्रेड ॲन्ड अमुल लाइट फॅट स्प्रेड या अन्नपदार्थांचे उत्पादन करणा-या राज्यातील नामांकीत

पेढ्यांच्या विविध ठिकाणी असणा-या कोल्ड स्टोरेजवर दिनांक २ जानेवारी, २०२० ते दिनांक १० जानेवारी, २०२० या कालावधीत धाडी टाकून फॅट स्प्रेड या अन्न पदार्थांचा एकुण रू.०१,०३,१९,९८२/- किंमतीचा साठा जप्त केला असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारवाई नंतर घेण्यात आलेल्या अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येऊन याबाबतच्या प्राप्त विश्लेषण अहवालानुसार सर्व संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्राप्त अहवालानुसार संबंधीत कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर कारवाईचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०४-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे. मात्र जप्त साठ्याची किंमत रु. १,०३,१९,३८२/- इतकी आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) विश्लेषणासाठी पाठविण्यात सर्व २४ अन्न नमुन्यांचे प्राप्त असून त्यापैकी १९ अन्न नमुने misbranded, जाहिरात व दावे नियमन २०१८ नुसार नसल्याचे तसेच कमी दर्जाचे असल्याचे आढळून आले आहेत तर ५ अन्न नमुना प्रमाणित घोषित करण्यात आला आहे. फेरतपासणीसाठी रेफरल प्रयोगशाळा येथे पाठविण्यात आलेल्या एका अन्न नमुन्याचा अहवाल प्रलंबित आहे.

अप्रमाणित अन्न नमुन्यांपैकी ५ प्रकरणात न्यायनिर्णय खटले दाखल करण्यात आले असून उर्वरित प्रकरणांमध्ये चौकशी सुरु असून तपास पूर्ण होताच न्यायनिर्णय खटले दाखल करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे व कोल्हापूर जिल्ह्यातील किल्ल्यांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याबाबत

**(४८) १३१६४ (१९-०७-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन किल्ले दुरुस्ती परिसर विकास व जतन संवर्धनाची कामे करण्यासाठी नियोजन केले असून त्यासंदर्भात राज्य पर्यटन संचालनालयाकडून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना सर्व विभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पुणे विभागीय संचालनालयाकडून पुणे जिल्ह्यातील शिवनेरी, सिंहगड, जीवधन व नाणेघाट किल्ल्यांचा तर कोल्हापूर जिल्ह्यातील रांगणा, भुदरगड व विशालगड किल्ल्यांचा विकास करण्यासाठीचा सविस्तर अहवाल शासनाला माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे विभागाच्या पर्यटन संचालनालयाने शासनाला सादर केलेल्या प्रस्तावाचे स्वरूप काय आहे व त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०४-०९-२०२०) :** (१), (२) व (३) राज्यातील निवडक किल्ल्यांच्या परिसरामध्ये पर्यटन विषयक सुविधा उपलब्ध करुन पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी पर्यटन संचालनालयाच्या सर्व विभागीय कार्यालयाकडून माहिती संकलित करुन एकत्रित प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जुन्नर, मावळ, वेल्हे व भोर (जि.पुणे) या तालुक्यांमध्ये फिरते मोबाईल पशुवैद्यकीय दवाखाने सुरू करण्याबाबत

**(४९) १३२४१ (१७-०७-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जुन्नर, मावळ, वेल्हे व भोर (जि.पुणे) या तालुक्यांमध्ये मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेअंतर्गत फिरते मोबाईल पशुवैद्यकीय दवाखाने सुरू करण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात या योजनेला तत्कालीन शासनाने माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली असताना अद्यापी अंमलबजावणी झाली नसल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे जिल्हयातील जुन्नर, मावळ, वेल्हे व भोर या तालुक्यांमध्ये फिरते मोबाईल पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०४-०८-२०२०) :** (१) खरे आहे.
(२) राज्यातील ३४९ ग्रामीण तालुक्यांमध्ये स्थापन करावयाच्या फिरत्या पशुचिकित्सा पथकांपैकी प्रथम टप्प्यात ८० तालुक्यांमध्ये नवीन ८० फिरती पशुचिकित्सा पथके स्थापन करण्यास दिनांक २५.२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
सदर योजनेची अंमलबजावणी प्रक्रिया सुरू असून, ८० फिरत्या पशुचिकित्सा पथकांपैकी ७३ पथके कार्यान्वीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजने अंतर्गत प्रथम टप्प्यात स्थापन करावयाच्या ८० तालुक्यांमध्ये पुणे जिल्हयातील जुन्नर, मावळ, वेल्हे व भोर या तालुक्यांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू (जि.पालघर) नगरपरिषदेतील पाणी पुरवठा योजनेच्या कामाला गती देण्याबाबत**

**(५०) १३६०९ (१६-०७-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) नगरपरिषदेच्या नियोजनशून्य कारभारामुळे नगरपरिषदेची सुमारे ३२ कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याने माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान डहाणू नगरपरिषद हद्दीतील नागरिकांनी मुख्याधिकारी यांना घेराव घालून संबंधित ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तद्नुसार ठेकेदारास पाठीशी घालणाऱ्या डहाणू नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई करून डहाणू नगरपरिषदेतील पाणी पुरवठा योजनेच्या कामाला गती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (११-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या देखरेखीखाली सुजल निर्मल अभियानाअंतर्गत चालू असलेले डहाणू शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेचे काम विहीत वेळेत पूर्ण न झाल्याने नगरपरिषदेमार्फत ठेकेदाराकडून रु.४६ लक्ष इतका दंड वसुल करण्यात आलेला आहे. तसेच नगरपरिषदेच्या दि.१५/२/२०२०, दि.२७/५/२०२० व दि.२३/६/२०२० रोजीच्या पत्रांन्वये ठेकेदारास लवकरात लवकर काम पूर्ण न केल्यास काम काढून घेणे व काळया यादीत समाविष्ठ करणेबाबत नोटीस देण्यात आलेली आहे. यानुसार ठेकेदाराविरुध्द नगरपरिषदेमार्फत कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.